# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः18.06.2026** **वारःगुरुवार**

---

1. जी-7 बैठकींच्या दरम्यान फ्रान्समधील एव्हीयाँ इथं पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रॅम्प यांच्यामध्ये द्विपक्षीय चर्चा. जागतिक अर्थव्यवस्थेसाठी होर्मूझची सामुद्रधुनी खुली ठेवणं महत्वाचं-पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं आग्रही प्रतिपादन
2. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांच्या हस्ते पुणे रेल्वे स्थानकावर विविध विकासकामांचा शुभारंभ आणि पायाभरणी, पुणे रेल्वे स्थानकाच्या विस्तारासाठी सुमारे 600 कोटी रुपयांची गुंतवणूक
3. विधानपरिषदेच्या 11 जागांसाठी राज्यात आज मतदान आणि
4. पन्नास षटकांच्या क्रिकेट सामन्यात भारतीय पुरुष संघाचा अफगाणिस्थानवर दणदणीत विजय; तर महिलांच्या टी20 विश्वचषक सामन्यांमध्ये भारताचा नेदरलँड्सवर 95 धावांनी विजय

**<u>मोदी</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी फ्रान्स दौऱ्याच्या अंतिम टप्प्यासाठी काल रात्री फ्रान्सची राजधानी पॅरिसमध्ये दाखल झाले. यावेळी भारतीय समुदायाच्या सदस्यांनी त्यांचं उत्साहात स्वागत केलं. या दौऱ्यात पंतप्रधान मोदी फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्राँ यांच्यासोबत 'विव्हाटेक 2026' या शिखर परिषदेत सहभागी होतील. 'विव्हाटेक' हा युरोपमधल्या तंत्रज्ञान आणि स्टार्टअप क्षेत्रातला सर्वात मोठा कार्यक्रम आहे.

तत्पूर्वी, जागतिक अर्थव्यवस्थेसाठी 'हॉर्मुझची सामुद्रधुनी' खुली ठेवणं अत्यंत महत्त्वाचं असल्याचं आग्रही प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या बरोबर काल फ्रान्समधील एव्हीयाँ इथं झालेल्या चर्चेदरम्यान केलं. जगाच्या विविध भागांमध्ये लाखो भारतीय खलाशी आपली सेवा बजावत आहेत, आणि त्यांच्या सुरक्षिततेस आपलं सर्वोच्च प्राधान्य असल्याचं मोदी यांनी सांगितलं. भारत आणि अमेरिका यांच्यातील व्यापारविषयक चर्चा सुरळीतपणे पुढे जात असल्याबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला.

पंतप्रधान मोदी आणि जर्मनीचे चॅन्सेलर फ्रेडरिक मर्झ यांच्यामध्ये पश्चिम आशियातील परिस्थिती आणि रशिया-युक्रेन संघर्ष यांसह प्रादेशिक आणि जागतिक घडामोडींवर द्विपक्षीय चर्चा झाली. भारत आणि जर्मनी यांच्यातील राजनैतिक संबंधांना या वर्षी 75 वर्षे पूर्ण होत असताना, दोन्ही नेत्यांनी व्यापार, संरक्षण, शाश्वत विकास, तंत्रज्ञान, शिक्षण यांसारख्या विविध क्षेत्रांमधील सहकार्य अधिक दृढ करण्याच्या आपल्या वचनबद्धतेचा पुनरुच्चार केला.

**<u>वैष्णव-रेल्वे</u>**

केंद्रीय रेल्वे तसंच माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांच्या हस्ते काल पुणे रेल्वे स्थानकावर विविध विकासकामांचा शुभारंभ आणि पायाभरणी करण्यात आली. यावेळी पुणे–साईनगर शिर्डी एक्सप्रेस रेल्वेला वैष्णव यांनी हिरवा झेंडा दाखवला. या कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे डिजिटल माध्यमातून सहभागी झाले. हडपसर स्थानकावर चौथा फलाट उभारण्यात आला असून त्यामुळं दररोज अतिरिक्त पाच रेल्वेगाड्या चालवणं शक्य होणार आहे. आळंदी इथं अत्याधुनिक मेगा कोचिंग टर्मिनल उभारण्यात येणार आहे.

पुणे रेल्वे स्थानकाच्या विस्तारासाठी सुमारे 600 कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यात येणार असून सहा नवीन फलाट उभारले जातील. त्यामुळे स्थानकावरील फलाटांची संख्या 12 होईल. तसंच जुन्या आरआरआय प्रणालीऐवजी अत्याधुनिक इलेक्ट्रॉनिक इंटरलॉकिंग प्रणाली कार्यान्वित करण्यात येणार आहे. पुढील तीन वर्षांत पुणे रेल्वे विभागाची क्षमता दुप्पट होऊन पुण्यातून सुमारे 20

अतिरिक्त रेल्वेगाड्या सुरू करता येतील, असा विश्वास वैष्णव यांनी व्यक्त केला. मुंबई–पुणे मार्गावर तिसरी आणि चौथी रेल्वेमार्गिका उभारण्याचं काम वेगानं सुरू असल्याचं त्यांनी सांगितलं. तसंच मुंबई–पुणे आणि पुणे–हैदराबाद या प्रस्तावित बुलेट ट्रेन मार्गांमुळं पुणे–मुंबई प्रवास अवघ्या 48 मिनिटांत, तर पुणे–हैदराबाद प्रवास सुमारे दोन तास आठ मिनिटांत पूर्ण होऊ शकेल, असं त्यांनी नमूद केलं. त्यानंतर, मंत्र्यांनी हडपसर रेल्वे स्थानकावरून नवीन पुणे-हडपसर-पाटणा-दानापूर अमृत भारत एक्सप्रेसला हिरवा झेंडा दाखवला.

**<u>वैष्णव-रांजणगाव</u>**

केंद्रीय इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी पुण्याजवळ रांजणगाव इथं बोलताना सांगितलं की, भारत जगातील सहाव्या क्रमांकाचा इलेक्ट्रॉनिक्स निर्यातदार देश बनला आहे. रांजणगाव एमआयडीसी इथं अमेरिकन कंपनी 'जाबिल'च्या नवीन उत्पादन प्रकल्पाचं उद्घाटन केल्यानंतर वैष्णव म्हणाले......

**कुछ वर्षों पहले किसी ने सोचा भी था की इलेक्ट्रॉनिक्स एक्सपोर्ट करेंगे इंडिया से इलेक्ट्रॉनिक्स एक्सपोर्ट वास कन्सिडर्ड अनथिंकेबल शुरू में टॉप टेन में आना एक टारगेट था लास्ट यर ट्वेंटी ट्वेंटी फाइव इलेक्ट्रॉनिक्स एएस एएन एक्सपोर्ट कैटेगरी बिकेम थर्ड लार्जेस्ट एक्सपोर्ट। कैटेगरी इन थे कंट्री सेकंड लार्जेस्ट एक्सपोर्टेड कैटेगरी बनना है जो सपोर्ट चाहिएगा गवर्नमेंट की तरफ से पूरा सपोर्ट मिलेगा स्टेट गवर्नमेंट का सपोर्ट आपने देखा सेंट्रल गवर्नमेंट का सपोर्ट रहेगा आज मैं आने से पहले टैलेंट डेवलपमेंट की बात कर रहा था टैलेंट के लिए व्हाटेवर इन्वेस्टमेंट इस रिक्वायर्ड वे विल मेक ठोसे इन्वेस्टमेंट।**

देशातील डिजिटल पायाभूत सुविधांच्या विकासात महाराष्ट्र आघाडीवर आहे आणि भारतातील एकंदर डेटा सेंटर क्षमतेपैकी सुमारे 60 टक्के क्षमता राज्यात असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितलं.

**<u>मोहोळ</u>**

राज्यातील आकाशवाणीची यंत्रणा अधिक बळकट करण्याचा विचार असून कोणतंही केंद्र बंद केलं जाणार नाही असं आश्वासन केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल पुण्यात केंद्रीय राज्यमंत्री आणि पुण्याचे खासदार मुरलीधर मोहोळ यांना दिलं. मोहोळ यांनी यासंदर्भात एक निवेदन वैष्णव यांना दिल्यानंतर त्यांनी हे आश्वासन दिलं.

**<u>वित्त आयोग</u>**

महाराष्ट्र देशामध्ये सर्वात जास्त सामाजिक उत्तरदायित्व निधी मिळविणारं राज्य आहे. या निधीच्या योग्य विनियोगासाठी 'स्टेट सीएसआर' कक्षाची निर्मिती करून त्या माध्यमातून स्थानिक स्वराज्य संस्थांना मिळविता येण्यासारख्या निधीचा विनियोग करावा, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल वर्षा निवासस्थानी आयोजित सहाव्या वित्त आयोगासंदर्भात करण्यात आलेल्या सादरीकरण बैठकीत दिले. ते म्हणाले की, केंद्र शासनाच्या बिनव्याजी कर्ज योजनेच्या धर्तीवर स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी बिनव्याजी कर्जाची योजना तयार करावी आणि त्यातून विकास कामांसाठी अशा स्वरुपाचं कर्ज उपलब्ध करून देण्याबाबत पडताळणी करावी. बैठकीत सहाव्या वित्त आयोगाच्या 42 शिफारशींवर विस्तृत चर्चा करण्यात आली. ह्या शिफारसी सहा भागांमध्ये विभागल्या गेलेल्या आहेत. यामध्ये संस्थात्मक सुधारणा, स्वतःचे उत्पन्नाचे स्त्रोत निर्माण करणे, कर मूल्यांकन आणि नियंत्रण, राज्याचं निधी वितरण, स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये निधीचं हस्तांतरण, वित्त आयोगाचं बळकटीकरण यांचा समावेश आहे.

**<u>सोमटणे-चिखली लाइन</u>**

राज्यात मध्य रेल्वेच्या सुमारे साडेतीन किलोमीटर लांबीच्या सोमाटणे-चिखली कॉर्ड लाईन या 172 कोटी रुपयांच्या प्रकल्पाला मान्यता देण्यात आली आहे. नव्या कॉर्ड लाईनमुळे चिखली आणि सोमाटणे यांना थेट जोडणी मिळणार असून पनवेल स्थानकावरचा ताण कमी होणार आहे. या प्रकल्पामुळं प्रत्येक मालगाडीचा सुमारे 110 मिनिटांचा विलंब टळणार असून दरवर्षी अतिरिक्त 9 कोटी टन मालवाहतूक हाताळणं शक्य होणार आहे. तसंच कंटेनर बंदर जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट मार्गावरील वाहतुकीला याचा थेट लाभ मिळणार आहे.

**<u>विधान परिषद</u>**

राज्यात विधानपरिषदेच्या 11 जागांसाठी आज मतदान होत आहे. सोलापूर, जळगाव, सांगली-सातारा, नांदेड, नागपूर, भंडारा-गोंदिया, नाशिक, अमरावती, धाराशीव-लातूर-बीड, परभणी-हिंगोली आणि छत्रपती संभाजीनगर-जालना अशा या अकरा जागा आहेत.

तर ठाणे, रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग, पुणे, यवतमाळ, वर्धा-गडचिरोली-चंद्रपूर आणि अहिल्यानगर या सहा जागांवर बिनविरोध उमेदवार निवडून आले आहेत.

**उबाठा-बिर्ला**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे लोकसभेतले खासदार अरविंद सावंत आणि अनिल देसाई तसंच राज्यसभेचे खासदार संजय राऊत यांनी काल लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला नवी दिल्लीत भेट घेतली आणि 'पक्ष-बदल विरोधी कायद्या'तील तरतुदींकडे लक्ष वेधणारं निवेदन सादर केलं. देसाई यांनी पत्रकारांना या भेटीची माहिती दिली. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या निवडणूक चिन्हावर निवडून आलेले काही खासदार स्वतंत्र गट म्हणून मान्यता मिळवण्यासाठी किंवा दुसऱ्या पक्षात विलीन होण्यासाठी लोकसभा कार्यालयाशी संपर्क साधत असल्याचं वृत्त आहे. मात्र राजकीय पक्षापासून स्वतंत्र असा कोणताही अधिकार विधिमंडळ पक्षाकडे नसतो. त्यामुळे पक्षाचं प्रतिनिधित्व करणाऱ्या दाव्याचा कुठलाही प्रस्ताव आल्यास शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला आपली बाजू मांडण्याची संधी दिल्याशिवाय कोणतीही अंमलबजावणी करू नये अशी विनंती सभापती बिर्ला यांना करण्यात आल्याचं देसाई यांनी सांगितलं.

**क्रिकेट**

भारत आणि अफगाणिस्थान यांच्यात लखनौमध्ये काल झालेल्या दुसऱ्या पन्नास षटकांच्या क्रिकेट सामन्यात भारतानं अफगाणिस्थानवर 170 धावांनी दणदणीत विजय मिळवला. अफगाणिस्थाननं नाणेफेक जिंकून भारताला फलंदाजी दिली. शुभमन गिलच्या 154 आणि ईशान किशनच्या 125 धावांच्या जोरावर भारतानं 402 धावांचा डोंगर रचला. त्याला प्रत्युत्तर देताना अफगाणिस्थान 232 धावाच करू शकला. शुभमन गिलला सामनावीर घोषित करण्यात आलं.

महिलांच्या टी-20 विश्वचषक स्पर्धांमध्ये काल लीड्स इथं भारतीय महिलांनी नेदरलँडस संघाचा 95 धावांनी पराभव केला. नाणेफेक जिंकून नेदरलँड्स संघानं क्षेत्ररक्षण निवडलं. भारतीय संघाच्या 209 धावांना प्रत्युत्तर देतांना नेदरलँड्सचा संघ सर्व बाद 114 धावा करू शकला.

**हवामान**

राज्यात तुरळक ठिकाणी वीजा आणि जोराच्या वाऱ्यांसह हलका ते मध्यम स्वरुपाचा पाऊस पडण्याचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.